Impact Factor 5.307 (SJIF)
**RESEARCH HUB**
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN 2582-9173

# भारतीय लोकशाही व पंचायत राज्य व्यवस्था

**प्रा. डॉ. नितेश आर. रामटेके**
श्री गोविंदप्रभु कला व वाणिज्य महाविद्यालय, तळोधी
मो.क्रमांक – ८३२९७५६२४२
Email-niteshramteke83@gmail.com

---

### प्रस्तावना :

भारतीय संविधान निर्माणकर्त्यांनी स्वातंत्र्य आंदोलनाची ध्येय व उद्दिष्टे प्रत्यक्षात उतरविण्यासाठी संविधान निर्माण केले. भारतीय जनतेने जाणिपुर्वक लोकशाही जीवनपध्दतीचा स्वीकार केला. शासनव्यवस्थेचा लोकशाही हा नैसर्गिक प्रकार नाही. दुर्बलावर वर्चस्व गाजवून सबलाने स्वत:चे हित साधावे ही मानवी जीवनातील सहज प्रवृत्ती असते. म्हणून सर्व नागरीकांना समान लेखणारा सर्वांना योग्य संधी देण्याचा प्रयत्न करणारा लोकशाही शासनव्यवस्थेचा प्रकार नैसर्गिक नसुन संस्कारांनी निर्माण केलेला शासनव्यवस्थेचा प्रकार आहे. या अर्थाने लोकशाही विचारप्रणाली फक्त राजकीय क्षेत्रापुरती मर्यादित न राहता, आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रात तिचा प्रसार होणे अभिप्रेत आहे. म्हणजेच लोकशाहीत कोणताही भेदभाव न करता व्यक्तिमत्वाच्या विकासाला प्राधान्य दिले जाते. कारण व्यक्तिच्या विकासातुन समाजाचाही विकास होतो ही लोकशाहीची मुलभूत धारणा आहे.

लोकशाहीत अंतीम सत्ता जनतेकडून शासनाकडे येत असली तरी त्या सत्तेचा वापर कोणाकडून केला जातो,किती प्रमाणात केला जातो, कसा केला जातो व सत्तेच्या वापराची रचनात्मक पध्दती कोणत्या प्रकारची व स्वरूपाची असते यावरून लोकशाहीची कसोटी खऱ्या अर्थाने लक्षात येते.

### विकेंद्रीकरणाची गरज :

आधुनिक काळात राज्यातील शासनसंस्थेला शासनातील सर्व कार्ये एकाच केंद्रतून प्रत्यक्षात पार पाडता येत नाहीत. जनतेच्या गरजा पुरविण्यासाठी विविध पातळयांवर शासकीय संस्था आणि स्थानिक संस्था निर्माण करून राज्यकारभार चालवावा लागतो या दृष्टिने सत्ता विकेंद्रीकरणाचा प्रश्न महत्वाचा ठरतो.

विकेंद्रीकरण म्हणजे वरीष्ठ संस्थांचे अधिकार खालच्या स्तरातील संस्थाकडे सोपविणे अथवा स्थानिक व विभागीय ‘संस्थाना केंद्रिय सत्तेच्या मदती शिवाय स्वंतत्रपणे स्वत:च्या योजना आखण्याचा अधिकार देणे होय. या व्याख्येनुसार स्थानिक अथवा विभागीय संस्था स्वायत असाव्यात असा अर्थबोध होतो.

### लोकशाही विकेंद्रीकरण :

स्थानिक संस्था लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींची असेल तर तेथे लोकशाही विकेंद्रीकरण असतेच असे नाही प्रतिनिधी नियुक्त अथवा निवडलेले असणे यावर विकेंद्रीकरण अवलंबुन नसते. सत्तांतर व हस्तांतरण केलेल्या सत्तेबाबत निर्णय घेण्याचे अधिकार व स्वायतता यावर विकेंद्रीकरण अवलंबुन असते. लोकशाही विकेंद्रीकरणात लोकशाही तत्वावर सत्तेचे विकेंद्रीकरण अवलंबुन असते. लोकांकडे अधिक अधिकार सोपाविले जातात व लोकराज्यांचे तत्व प्रत्यक्षात उतरविले जाते. स्थानिक लोकांत स्वत:ची कामे स्वत:च्या जबाबदारीवर पार पाडण्याची कार्यक्षमता निर्माण व्हावी हा त्यामागे उद्देश असतो. स्वातंत्र्योत्तर काळात महात्मा गांधीच्या स्वप्नातील भारत साकार करण्याच्या उद्देशाने पंचायतराज व्यवस्थेची स्थापना करण्यात आली. ‘लोकशाही विकेंद्रीकरण’ आणि पंचायत राज्य हे दोन्ही पर्यायी शब्द आहेत. भारतात पंचायत राज्य व्यवस्था लागू करण्यात पंडीत नेहरूंचे महत्वाचे योगदान आहे.

### पंचायतराज व्यवस्था :

पंचायतराज व्यवस्थेत जनतेला राज्यकारभार चालविण्याचे शिक्षण प्रत्यक्ष कारभार चालविण्याच्या अनुभवाने मिळते.

Research Hub International Journal

आर्थिक, सामाजिक आणि राजकीय बाबींचा लहान आणि मार्यादीत अशा क्षेत्रात साकल्याने विचार करून साधनांची उपलब्धता लक्षात घेवून शक्य असलेल्या अनेक पर्यायातून कोणता पर्याय श्रेयस्कर राहील याचा निर्णय घेण्याचे शिक्षण मिळावे हा हेतु आहे. तसेच प्रत्येक सेवा समाजोपयोगी कशी होईल व ती त्या क्षेत्रात राहणाऱ्या सर्व जनतेला जास्तीत जास्त प्रमाणात कशी उपलब्ध करून देता येईल,याबाबत योजना आखून ती कार्यवाहीत आणण्याचे शिक्षण मिळावे. लहान आणि मर्यादित क्षेत्रांमधून निवडून आलेल्या जनप्रतिनिधींनी आपली जबाबदारी कशी पार पाडावी आणि लोकनियंत्रण प्रत्यक्षात कसे अमलात आणावे. आजच्या विशिष्ट गरजांचा आणि भविष्यातील गरजांचा विचार करून त्यांच्या पुर्ततेसाठी तात्पुरते व कायमचे अल्पकालीन आणि दिर्घकालीन कोणते उपाय योजावे याचा विचार करण्याचे शिक्षण मिळणे हा स्थानिक स्वराज्याचा, पंचायत राज्य व्यवस्थेचा उद्देश आहे.

लोकशाही विकेंद्रीकरण व पंचायत राज्य हे पर्यायवाची शब्द आहेत व त्यांचे संस्थात्मक स्वरूप म्हणजे स्थानिक प्रशासन होय.

## पंचायत राज व्यवस्थेची वैशिष्टये :

पंचायत राज म्हणजे केंद्र सरकारच्या नियंत्रणाखाली किंवा राज्यसरकाच्या नियंत्रणाखाली स्थानिक जनतेच्या समस्यांचा तसेच त्यांच्या कल्याणाचा विचार करणारी अशी संस्था होय की जीचा कारभार त्याठिकाणी प्रत्यक्ष जनताच चालवित असते. पंचायत राज व्यवस्थेची काही ठळक वैशिष्टये पुढिलप्रामणे

- विधिमंडळाच्या कायद्याव्दारे निर्मीत व्यवस्था
- स्थानिक लोकांचा प्रत्यक्ष सहभाग असणारी संस्था
- स्थानिक विषयासंबधी किंवा समस्या संबंधी निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य असणारी संस्था
- सर्वसामान्यांचे हित हाच उद्देश केंद्रस्थानी ठेवून निर्माण झालेली व्यवस्था.
- शहरी व ग्रामीण असे दुहेरी स्वरूपात कार्य करते.
- पंचायत राज व्यवस्थेचे कार्यक्षेत्र हे भौगोलीकदृष्टया मार्यादित असते.
- पंचायत राज व्यवस्थेचे अस्तिव्य हे त्याच्या निर्णय प्रक्रियेत जनतेच्या सहभागावर अवलंबुन असते.

## पंचायत राज व्यवस्थेचे महत्व :

आधुनिक काळात सर्वच देशांनी कल्याणकारी राज्य संकल्पनेचा स्विकार केलेला आहे. त्यामुळे राज्याच्या कार्यक्षेत्रामध्ये प्रचंड वाढ झाली आहे. राज्याच्या कार्यात झालेली अत्याधिक वाढ हिच पंचायतराज व्यवस्थेच्या निर्मीतीस कारण ठरलेली दिसुन येते. पंचायतराज व्यवस्थेच्या निर्मितीपासूनच तीचे महत्व निर्वीवादपणे सर्वांना मान्य करावे लागते. पंचायतराज व्यवस्थेचे थोडक्यात महत्व पुढिलप्रामणे

- केंद्र सरकारवरील कार्याचा भार कमी होतो.
- स्थानिक व केंद्रीय प्रशासन अधिक कार्यक्षम बनते.
- भ्रष्टाचारावर योग्य प्रतिबंध घालता येतो
- जनसहभागातुन लोकशाही अधिक मजबुत होते.
- समाजसेवा करण्याची संधी बहुसंख्य नागरीकांना प्राप्त होते.
- प्राथमिक व मुलभूत सेवा सुविधा उपलब्ध करून देणे सोपे झाले.

अशाप्रकारे आधुनिक राज्यात स्थानिक स्वशासन व्यवस्थेला तथा पंचायतराज व्यवस्थेला महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे आधुनिक काळात पंचायतराज व्यवस्थेची भुमिका महत्वपूर्ण ठरत असल्यामुळे पंचायती व्यवस्थेला राष्ट्राची शक्ती असे संबोधिले जाते.

**संदर्भग्रंथ सुची :**


- रा.ज.लोटे – भारतातील स्थानिक स्वशासन, पिंपळापुरे प्रकाशन,नागपूर, आक्टो २०१२
- डॉ. श. गो. कोलारकर – '' स्वतंत्र भारताचा इतिहास, श्री मंगेश प्रकाशन, नागपुर, नोव्हे. १९९६
- प्रा. जे. बी. नाडे – पंचायत राज व ग्रामीण विकास, २०१६
- प्रा के आर. बंग – भारतीय स्थानिक स्वशासन
- बि.बी. पाटील – पंचायती राज्य
- डॉ. सुदर्शन डी. खापरे – ग्रामपंचायतीचे 'प्रशासन'


Research Hub International Journal